शिक्षकांकरिता वरिष्ठ व निवड श्रेणी
लागू करणेबाबत सुधारित तरतूदी.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्र. शिप्रधो-२०१९/प्र.क्र.४३/प्रशिक्षण

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२
दिनांक :- २६ ऑगस्ट, २०१९

<u>संदर्भ</u>- १. शिक्षण व सेवायोजन विभाग शासन निर्णय क्र.चवेआ-१०८९/१११/मा.शि.-२, दि.०२ सप्टेंबर,१९८९
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.पाटीसी १०९७/(३९७/९७)/माशि-४, दि.२९ जून, २००२.
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.शिप्रधो-२२१७/प्र.क्र.३९/२०१७/ प्रशिक्षण,दि.२३ ऑक्टोबर, २०१७.
४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.शिप्रधो-२०१८/प्र.क्र.(७२/१८)/प्रशिक्षण, दि.२१ डिसेंबर, २०१८.
५. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. विऊसू ३२१९/प्र.क्र.११२/टिएनटी-३, दि. ३१ जुलै, २०१९.

<u>प्रस्तावना</u>-

संदर्भ क्रमांक ४ येथे नमूद शासन निर्णयातील तरतूदींनुसार, खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणे, वरिष्ठ श्रेणीतील २० टक्के पदांना सेवाजेष्ठतेनुसार निवड श्रेणीची अट तसेच शासन निर्णय दि. २३ ऑक्टोबर, २०१७ मधील वरिष्ठ व निवड श्रेणीत पात्र होण्यासाठी अटींचे पुनर्विलोकन करणे याकरिता मा. आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली. तथापि, दि. २३ ऑक्टोबर, २०१७ मधील शासन निर्णयातील तरतूदींनुसार वरिष्ठ व निवड श्रेणी संदर्भात प्रशिक्षण तसेच शाळांच्या भौतिक सुविधांशी संबंधित अटी वगळण्याबाबत शिक्षक संघटनांकडून सातत्याने मागणी करण्यात येत होती. त्यामुळे या अटी वगळण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> -

**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे नविन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना खाजगी शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत** शासन निर्णय दि. ३१ जुलै, २०१९ अन्वये नियुक्त केलेल्या अभ्यासगटाचा अहवाल व त्यावरील शिफारशी विचारात घेऊन यासंदर्भातील निर्णय अंतिम होईपर्यंत शिक्षकांना वरिष्ठ/निवड श्रेणी लागू करण्यासंदर्भातील कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील:-

१. शासन निर्णय दि. २३ ऑक्टोबर, २०१७ पूर्वी वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणीकरिता असलेल्या निकषांप्रमाणे वरिष्ठ व निवड श्रेणीकरिता पात्र असणाऱ्या शिक्षकांची यादी संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी तातडीने जाहीर करावी.

२. जे शिक्षक वरिष्ठ/निवड श्रेणीकरिता पात्र झाले आहेत, त्यांना याकरिता स्वतंत्र अथवा विशेष प्रशिक्षण पूर्ण करण्याची आवश्यकता नाही. यासंदर्भातील दि. २३ ऑक्टोबर, २०१७ व दि. २१ डिसेंबर, २०१८ चे शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

३. वरिष्ठ/निवड श्रेणी मंजूर करताना शिक्षकांचे मागील २ वर्षाचे समाधानकारक गोपनीय अहवाल विचारात घेण्यात यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०८२७१७३५४८१५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SANJAY DATTATRAY MANE

Digitally signed by SANJAY DATTATRAY MANE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=7322cf22539d1c2a9ec41d18debd6a1b1822daa203eedff083386e6f6686c0f5, postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI,
serialNumber=cc816238ed3c914e2fa2e99da4bc0ba4e1f6947aa23ad145e3dc6a469041090f, ou=SPORTS EDUCATION AND SPORTS DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY DATTATRAY MANE
Date: 2019.08.30 12:49:39 +05'30'

**( संजय द. माने )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव
२. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. मा. सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
७. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. अध्यक्ष / सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, विद्याप्राधिकरण, पुणे.
११. सर्व विभागीय अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
१२. सर्व विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
१३. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१४. सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था
१५. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद
१६. शिक्षण निरिक्षक, मुंबई (पश्चिम, दक्षिण, उत्तर)
१७. सर्व प्रशासन अधिकारी, महानगरपालिका
१८. सर्व मुख्य अधिकारी, नगरपालिका
१९. सर्व गटशिक्षणाधिकारी
२०. सर्व मुख्याध्यापक (शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत)
२१. निवड नस्ती, प्रशिक्षण.